# आरोग्य सेवा आयुक्तालय, (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन " सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डी. डिमेलो रोड, मुंबई.

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| आयुक्त | २२६२१०३१-३६ | Email : dhs_२००५@rediffmail.com |
| संचालक (वैयक्तीक) | २२६२०२३५ | Email : jdhs०3@gmail.com |
| सहसंचालक, रुग्णालये (राज्यस्तर) | २२६२१००६ | dhsdesk3@gmail.com |
| | २२६११४७१ | |


क्र.आआसे/कक्ष-३/टे-२/रुग्णशुल्क/ नि:शुल्क/Hos-१२०८२३/२३.

दिनांक - १२ ऑगस्ट २०२३.

विषय - सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकिय आरोग्य संस्थामधून देण्यात येणा-या आरोग्य सेवा, तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्क नि:शुल्क करण्याबाबत.

संदर्भ - १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४६२/भाग-२/आरोग्य-३, दिनांक २८ डिसेंबर २०१५.

२) शासन निर्णय क्र. एनएचएम-११२०/प्र.क्र.८३/आरोग्य-७, दिनांक २८ जूलै २०२१.

३) आयुक्तालयाचे पत्र क्र. राआसो/आरकेएस कक्ष/शा.नि./प्र.क्र. / ५९८३६-८५८/२०२१, दिनांक २४ सप्टेंबर २०२१.

४) मंत्रीमंडळ निर्णय दिनांक ०३ ऑगस्ट २०२३

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील आरोग्य संस्थामध्ये उपचारासाठी येणा-या लाभार्थ्यांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील रुगणांचा बहुतांशी समावेश असतो. या रुग्णांना क्वचित प्रसंगी उपचाराकरिता, तपासणीकरिता शासन निर्णय क्र. १ अन्वये माफक दरात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तथापि आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना आर्थिक विवचंनेमूळे ब-याचदा माफक दरातील आरोग्य सुविधा सुध्दा घेणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, परिणामी असे रुग्ण औषधोपचारापासून वंचित राहू नये याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांनी सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून सर्व शासकिय आरोग्य संस्थामधून देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा नि:शुल्क करण्याबाबत विधानसभेमध्ये घोषणा केलेली आहे. तसेच दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकिय रुग्णालयामधून करण्यात येणा-या तपासण्या व उपचार तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील वैद्यकिय सेवा ( राष्ट्रीय रक्त धोरणानुसार व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणारे शुल्क वगळून ) नि:शुल्क करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून सर्व शासकिय आरोग्य संस्थामधून देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा नि:शुल्क देण्याबाबत केलेल्या घोषणेनुसार संदर्भ क्र. १ नुसार आकारण्यात येणारे रुग्णशुल्क दिनांक १५ ऑगस्ट २०२३ पासून आकारण्यात येऊ नये.

दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाबाबत शासन स्तरावरुन स्वंतत्ररित्या शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर व्यापक स्वरुपाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

**अंमलबजावणी.**

१) आरोग्य संस्थेमध्ये येणा-या रुग्णांना शासनाने अधिकृत केलेल्या ओळखपत्राच्या आधारे नि:शुल्क नोंदणी करण्यात यावी.

२) आरोग्य संस्थामध्ये होत असलेल्या सर्व प्रकारच्या तपासण्या नि:शुल्क करण्यात यावेत किंवा कोणत्याही प्रकारचे दर आकारण्यात येऊ नये.

३) बाहयरुग्ण विभागामध्ये कार्यरत वैद्यकिय अधिका-यांनी रुग्णांना बाहेरुन औषधी व इतर कंझ्युमेबल्स खरेदी करण्याकरिता चिठ्ठी देऊ नये.

४) क्वचित प्रसंगी बाहेरील औषधी रुग्णांस देणे आवश्यक असल्यास आरकेएस अनुदानातून स्थानिकरित्या औषध खरेदी करुन रुग्णांस मोफत उपलब्ध करुन द्यावे.

५) आरोग्य संस्थामध्ये होणा-या चाचण्या ( उदा. इसीजी, एक्स-रे, सिटी स्कॅन, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादी ) यांचे शुल्क आकारण्यात येऊ नये.

६) आंतररुग्ण विभागामध्ये दाखल असलेल्या रुग्णांस डिचार्ज करतांना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये.

७) यापूर्वी रुग्णांकडून जमा करण्यात आलेले शुल्क शासन खाती अथवा रुग्ण कल्याण निधीमध्ये जमा करण्यात यावे व त्याबाबतचा लेखाजोखा अद्ययावत करण्यात यावा.

**जनजागृती.**

१) या योजनेची जनतेला माहिति व्हावी, या हेतूने सविस्तर माहिती व्यापक स्वरुपावर प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्द करण्यात यावी.

२) आरोग्य संस्थेच्या आवारात याबाबत दर्शनी भागात फलक लावण्यात यावेत.

३) आरोग्य संस्थेमध्ये रुगणसेवेबाबत शुल्क आकारल्याबाबतची तक्रार टोल फ्री १०४ क्रमांकच्या नंबर करता येईल, याबाबत सुस्पष्ट जनजागृती करण्यात यावी.

**तक्रार निवारण.**

१) टोल फ्री १०४ क्रमांकावर प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेतली जाईल व त्याबाबत संबंधित संस्था प्रमूखाला तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्यचिकित्सक यांना अवगत केले जाईल.

२) प्राप्त झालेल्या तक्रारीची निवारण करण्याची जबाबदारी ही संबधित संस्था प्रमूखाची राहील.

३) आरोग्य संस्थेमध्ये शुल्क आकारण्यात आल्याचे आढळल्यास संबधित कर्मचारी /अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा शल्यचिकित्सक/ जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

संनियत्रण समिती.

जिल्हा स्तर.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा शल्यचिकित्सक, | - अध्यक्ष |
| २) | जिल्हा आरोग्य अधिकारी | - सहअध्यक्ष |
| ३) | अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक | - सदस्य |
| ४) | मुख्य प्रशासकिय अधिकारी/प्रशासकिय अधिकारी | - सदस्य |
| ५) | मेट्रन | - सदस्य |
| ६) | निवासी वैद्यकिय अधिकारी ( बाहयसंपर्क ) | - सदस्य सचिव. |

तालुका स्तर.

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिक्षक | - अध्यक्ष |
| २) | तालुका आरोग्य अधिकारी | - सह अध्यक्ष |
| ३) | प्राआकें एक वैद्यकिय अधिकारी | - सदस्य |
| ४) | अधिक्षक/सहायक अधिक्षक | - सदस्य सचिव. |

वरील समितीची बैठक दरमहा आयोजित करुन तक्रारीचा आढावा घेण्यात यावा.

धीरज कुमार (भा.प्र.से.) 14/8/23
आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रति,

१) उपसंचालक आरोग्य सेवा, ( सर्व )
२) जिल्हा शल्यचिकित्सक, ( सर्व )
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
४) वैद्यकिय अधिक्षक/ वैद्यकिय अधिकारी , विभागीय संदर्भ सेवा/ सामान्य/स्त्रि /उपजिल्हा/ ग्रामीण/ प्राआके ------

प्रत माहितीसाठी सविनय सादर.
मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
विभागीय आयुक्त, विभागीय कार्यालये ( सर्व )
जिल्हाधिकारी, ( सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदे ( सर्व )